Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास उपक्रमातील अविरत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास.

**मार्गदर्शक**
**प्रा.डॉ.आशु आल्हाद भावसार- धारस्कर**
सहयोगी प्राध्यापक
शासकीय अध्यापक महाविद्यालय,अकोला.

**संशोधक**
**अरविंद रामहरी शिंगाडे**
अभ्यासकेंद्र- 202, शासकीय अध्यापक महाविद्यालय,अकोला.

## सारांश-

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकापासून जागतिक स्तरापासून खालपर्यंत सर्व स्तरांवर मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले आहे. यामधून शैक्षणिक क्षेत्रही सुटले नाही. या सर्व बदलांच्या गुणदोषांचे विवेचन करणे हे जरी अपेक्षित नसले तरी या बदलांचा शैक्षणिक संशोधन क्षेत्रात विविध पैलूंवर जो परिणाम झालेला आहे, त्याचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण हे परिवर्तनाचे मोठे साधन आहे. तसेच ते मानवी जीवनाच्या प्रगतीचेही सक्षम साधन आहे. शिक्षणाशिवाय कोणतीही व्यक्ती, समाज समृद्ध होऊ शकत नाही. भारतीय घटनेतील मार्गदर्शक तत्वाअंतर्गत कलम ४५ मधील तरतुदीनुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे आवश्यक आहे. या मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाला दर्जेदार बनविण्याची जबाबदारी शिक्षकांची असते. गेल्या तीन दशकात देशात आणि महाराष्ट्रातही मध्यमवर्गातील लोकसंख्या आणि लोकसंख्येचे प्रमाण वेगाने वाढले. नवीन व्यवस्थेमध्ये शिक्षणाकडेही एक उपभोग्य भाग म्हणून समाज पाहू लागला. आपली मुले ज्या शाळेत शिकतात,त्या शाळेला एक प्रतिष्ठा असावी अशी भावना समाजात बळावली. त्यामुळे कोणत्याही शाळेचा दर्जा हा शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. शैक्षणिक धोरणांची आखणी करत असताना शिक्षकांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षमीकरणासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात. नोकरीच्या क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर फक्त अध्यापनापुरतेच शिक्षकाचे कार्य मर्यादित न राहता त्याने स्वतःला बदलत्या काळानुसार समृद्ध करण्याचे तयारी ठेवणेही आवश्यक असते.

**बीज शब्द-** ऑनलाईन प्रशिक्षण, माध्यमिक शिक्षक, व्यावसायिक क्षमता.

## संशोधन निबंध विषय-

सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास उपक्रमातील अविरत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास.

## संशोधन निबंध विषयाची उद्दीष्टे-

सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास उपक्रमातील विविध शिक्षक प्रशिक्षणांचा शोध घेणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास उपक्रमातील अविरत ऑनलाईन प्रशिक्षण टप्पा क्रमांक ४ पूर्ण केलेल्या माध्यमिक शिक्षकांचा शोध घेणे.

सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास उपक्रमातील अविरत ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण केलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतांचा शोध घेणे.

## संशोधनाचे महत्त्व

या संशोधनाचे महत्त्व खालील प्रमाणे आहे-

कार्यरत माध्यमिक शिक्षकांना सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाच्या संदर्भात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची सद्यस्थिती काय आहे? त्याचे स्वरूप कसे आहे ?याची माहिती मिळण्यास मदत होईल.

या संशोधनामुळे सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास या कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या अविरत प्रशिक्षण कार्यक्रमाची अधिक माहिती मिळेल.

या कार्यक्रमामुळे शिक्षकांना आपल्या व्यवसाय समृद्धीसाठी अविरत प्रशिक्षणाचा कितपत फायदा झाला, हे समजेल.

## संशोधन निबंध विषयाची परिकल्पना-

सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास उपक्रमातील अविरत ऑनलाईन प्रशिक्षणाचा माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतांवर परिणाम होत नाही.

## विषय प्रतिपादन-

व्यावसयिक विकास म्हणजे व्यक्तीने आपली जीवनप्रणाली प्रगत ठेवण्यासाठी सतत घेत असलेले शिक्षण व प्रशिक्षण होय. शिक्षकांसाठी व्यावसायिक विकास आणि विकासाची संकल्पना अधिक व्यापक आहे.

## सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास

शिक्षकांनी आपल्या व्यवसायात प्रगती करणे सुरु ठेवले पाहिजे. सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी अनेक मार्ग खुले आहेत.शिक्षणातील नवीनतम संशोधन शोधण्यासाठी व्यावसायिक विकास अभ्यासक्रम हा एक उत्तम मार्ग आहे. आपण आपल्या व्यावसायिक संवर्धनासाठी शिक्षणक्षेत्रातील नवनवीन संकल्पना, साधने व तंत्रे यांचा वापर करून अध्यापन प्रक्रिया अधिक परिणामकारक करू शकतो. अलीकडच्या काळात व्यावसायिक विकासामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग होऊ लागला आहे. व्यावसायिक विकास करण्यासाठी ऑनलाईन साधनांची उपलब्धता वाढलेली आहे. त्या माध्यमातून शिक्षकांना आपली व्यावसायिक अभिवृद्धी करता येते. कार्यरत शिक्षकांसाठी शासनाच्या वतीने विविध प्रशिक्षणांची निर्मिती व अंमलबजावणी केली जाते. अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकांना मदत व्हावी, अध्यापन प्रक्रिया परिणामकारक व्हावी, विद्यार्थ्यांच्या गरजांप्रमाणे त्यांना आवश्यक त्या संकल्पनांचे ज्ञान व्हावे ही प्रमुख उद्दिष्टे यामागे असतात. सोबतच शिक्षक म्हणून आपल्या विद्यार्थ्यांची संपूर्ण ओळख शिक्षकांना व्हावी, हाही उद्देश सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम निर्मितीमध्ये असतो. सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासात सेवांतर्गत प्रशिक्षणाचे महत्त्वाचे स्थान आहे.

## शिक्षकांची गुणवत्ता

राष्ट्रीय धोरण दस्तऐवजात शिक्षकांसाठी अधिक चांगल्या तरतुदी सुचवण्यात आल्या होत्या. त्यात असेही म्हटले होते की, शिक्षकाचा दर्जा हा समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक मूल्यांचे प्रतिबिंब असतो; असे म्हटले जाते की कोणताही समाज आपल्या शिक्षकांच्या पातळीपेक्षा वरचढ ठरू शकत नाही. सरकारने आणि समाजाने अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, ज्यामुळे शिक्षकांना विधायक आणि सर्जनशील मार्गांनी प्रेरित होण्यास मदत होईल. शिक्षकांना संवादाची साधने आणि नवनिर्मितीचे स्वातंत्र्य असले पाहिजे, जेणेकरून ते समाजाच्या गरजा, क्षमता आणि चिंतांशी संबंधित योग्य

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

उपक्रम तयार करू शकतील. शिक्षक भरतीच्या पद्धती गुणवत्ता, वस्तुनिष्ठता आणि स्थानिक व कार्यात्मक आवश्यकतांशी सुसंगतता सुनिश्चित करण्यासाठी मान्यताप्राप्त असतील. शिक्षकांचे वेतन आणि सेवाशर्ती त्यांच्या सामाजिक व व्यावसायिक जबाबदाऱ्यांशी आणि या व्यवसायात प्रतिभा आकर्षित करण्याच्या गरजेनुसार सुसंगत असल्या पाहिजेत. देशभरातील शिक्षकांसाठी एकसमान वेतन, सेवाशर्ती आणि तक्रार निवारण यंत्रणा ही इच्छित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रयत्न केले जातील. शिक्षक संघटनांनी व्यावसायिक सचोटी जपण्यात, शिक्षकांचा सन्मान वाढवण्यात आणि व्यावसायिक गैरवर्तन रोखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे. राष्ट्रीय स्तरावरील शिक्षक संघटनांनी शिक्षकांसाठी व्यावसायिक नीतिमत्तेची संहिता तयार करावी आणि तिचे पालन सुनिश्चित करावे

## अध्यापन क्षमता:

जेव्हा आपण शिक्षक किंवा त्यांच्या अध्यापन व्यवसायाबद्दल बोलतो, तेव्हा शिकवणे हे शिक्षकाच्या प्रमुख कार्यांपैकी एक असते. परंतु शिकवणे ही विद्यार्थ्यांना योग्य अध्यापन-अध्ययन उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने विविध निवडक अनुभवांमधून मार्गदर्शन करण्याची एक गुंतागुंतीची कला आहे. हा शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील आत्म-अभिव्यक्तीच्या स्वरूपातील एक उत्स्फूर्त संवाद आहे, ज्यासाठी खऱ्या सर्जनशीलतेची आवश्यकता असते. अलीकडील संशोधनानुसार, वर्गातील उपक्रमांच्या आयोजनातील व्यावसायिक दृष्टिकोन, निष्पक्षता, शांतता, सामाजिकता, बुद्धिमत्ता आणि वर्गातील परिस्थितीशी जुळवून घेण्याची तयारी, साधनसंपन्नता आणि शिकवण्यातील आवड ही एका चांगल्या शिक्षकाची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे, वरील बाबी लक्षात घेता, मौलिकता असलेल्या पात्र आणि सक्षम अध्यापन कर्मचाऱ्यांची ओळख पटवणे हे सर्व शैक्षणिक चिंतांपैकी एक सर्वात महत्त्वाचे कार्य ठरते. जर सक्षम शिक्षक तयार करता आले, तर अपेक्षित शैक्षणिक परिणाम साध्य करण्याची खात्री मोठ्या प्रमाणात होते.म्हणून, शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांना एक महत्त्वाची भूमिका बजावी लागते. शिक्षणातील कोणत्याही पुरोगामी सुधारणेचे यश हे शिक्षकाच्या गुणात्मक सुधारणेतून आणि त्याच्या व्यावसायिक विकासातून सुरू झाले पाहिजे. व्यावसायिक क्षमतेचा विकास हा प्रामुख्याने शिक्षकाच्या योग्य क्षमतेच्या मूल्यांकनावर अवलंबून असतो. जर शिक्षकाकडे क्षमता आणि वचनबद्धता असेल, जर त्यांना वर्गात तसेच समाजात त्यांची अनेकविध कार्ये पूर्णपणे व्यावसायिक पद्धतीने पार पाडण्यासाठी सक्षम केले गेले, तर शिक्षकाच्या उत्तम कामगिरीपासून सुरू होणारी आणि उच्च दर्जाच्या शिक्षणात परिणत होणारी एक साखळी प्रतिक्रिया आपोआप सुरू होते. अशा प्रकारे, शिक्षण प्रणालीचे यश हे मुख्यत्वेकरून आपला व्यवसाय स्वीकारणाऱ्या शिक्षकांच्या क्षमतेवर अवलंबून असते.

## संशोधन निबंध विषयाचे निष्कर्ष-

शिक्षकाला नियमितपणे सेवांतर्गत प्रशिक्षणात सहभागी होऊन, त्याची कर्तव्ये सर्वोच्च पातळीवर पार पाडण्यास मदत करण्यासाठी आवश्यक आणि पात्र असलेला दर्जा देणे. शिक्षकांच्या संसाधनांच्या समृद्धीमध्ये, त्यांच्या सेवेदरम्यान त्यांनी केलेल्या आणि व्यावसायिक वाढीस हातभार लावण्यासाठी तयार केलेल्या सर्व उपक्रमांचा समावेश होतो. शिक्षकांच्या व्यावसायिक समृद्धीसाठीच्या प्रमुख उपक्रमांमध्ये परस्परसंबंधित अभ्यासक्रमांचे दीर्घकालीन कार्यक्रम, दीर्घकालीन अभ्यासक्रम, अल्पकालीन अभ्यासक्रम, वैयक्तिक साहाय्य आणि स्वयं-निर्देशित शिक्षण यांचा समावेश होतो.

शिक्षक अनेकदा विशिष्ट पदवी अभ्यासक्रम नसले तरीही, सहसा महाविद्यालय किंवा विद्यापीठात दीर्घकालीन अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतात. बऱ्याचदा हे अभ्यासक्रम एकतर प्रमाणपत्राच्या आवश्यकतांशी किंवा पगारवाढीशी संबंधित असतात.

शिक्षक अल्प-मुदतीच्या अभ्यासक्रमांमध्ये अगदी आनंदाने सहभागी होतात, विशेषतः जर एखादा अभ्यासक्रम त्यांना वर्गात तात्काळ वापरता येईल असे विशिष्ट कौशल्य शिकण्यास मदत करण्यासाठी तयार केलेला असेल.

शिक्षकांच्या सेवांतर्गत शिक्षणामुळे शालेय शिक्षणात गुणात्मक सुधारणा अपेक्षित आहे. त्यामुळे, त्याचे नियोजन अभ्यासक्रम

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

अंमलबजावणी धोरणाचा एक अविभाज्य भाग म्हणून केले पाहिजे. ही काही आवश्यक संसाधनांच्या उपलब्धतेनुसार आयोजित केली जाणारी 'अतिरिक्त' बाब नाही, किंवा केवळ नावापुरती पार पाडली जाणारी एक औपचारिकताही नाही. सेवांतर्गत शिक्षण हे अंतिम ध्येय नसून, ते शिक्षकांच्या निरंतर व्यावसायिक विकासासाठी असलेल्या अनेक साधनांपैकी आणि धोरणांपैकी केवळ एक आहे.

सेवांतर्गत प्रशिक्षण हे सर्वात दीर्घ आणि तुलनेने अधिक महत्त्वाचे असण्याची अपेक्षा आहे. प्रारंभिक प्रशिक्षणाचा उद्देश केवळ शिक्षकाला शिकवण्याचा 'परवाना' देणे आणि त्याला शिक्षक म्हणून करिअरमध्ये प्रवेश मिळवून देणे हा असतो. तथापि, ते या व्यवसायासाठी आवश्यक असलेले केवळ किमान ज्ञान आणि अध्यापन कौशल्ये प्रदान करते. परंतु प्रभावीपणे काम करत राहण्यासाठी, बदलत्या समाजाच्या गरजेनुसार शिक्षकाला ज्ञान आणि अध्यापन कौशल्यांमध्ये सतत वैयक्तिक आणि व्यावसायिक नूतनीकरण, तसेच कार्यांची आणि कौशल्यांची पुनर्रचना करणे आवश्यक असते. म्हणूनच प्रत्येक शिक्षकाला त्याच्या/तिच्या प्रारंभिक प्रमाणपत्रापलीकडे जाऊन प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

सेवांतर्गत प्रशिक्षण हा निःसंशयपणे प्रत्येक शिक्षकाने घ्यायलाच हवा असा विषय आहे. त्यामुळे, कोणताही शिक्षक त्याला मिळालेल्या प्रारंभिक आणि परिचय प्रशिक्षणाने समाधानी राहू नये आणि राहणारही नाही. कौशल्य आणि विशेषीकरणात पुढे जाण्यासाठी त्याला सेवांतर्गत प्रशिक्षणाची आवश्यकता असते. तसेच, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमतांनी शिक्षकाला सुसज्ज करण्यासाठीही हे प्रशिक्षण गरजेचे आहे.

## संशोधन निबंध विषय शिफारशी-

शिक्षकांना त्यांच्या विशेष क्षेत्रातील अद्ययावत सामग्रीने सुसज्ज करणे.

शिक्षकांना स्वयं-अध्ययनाची सवय लावणे, जेणेकरून ते त्यांच्या स्वतःच्या आणि संबंधित क्षेत्रांतील नवीनतम घडामोडींशी अद्ययावत राहतील.

शिक्षकांना शिकवण्याच्या किफायतशीर आणि प्रभावी पद्धती शिकण्यास मदत करणे.

शैक्षणिक विस्तारासंदर्भात वैयक्तिक गरजा, शालेय गरजा आणि राज्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी योग्य आणि विविध कार्यक्रम विकसित करणे.

सेवांतर्गत शिक्षण घेतलेल्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा उद्देश अधिक दृढ करण्यासाठी त्यांचा पाठपुरावा करणे.

## संदर्भग्रंथ सूची-

कुंडले म.बा.,(२०१२)'शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र', पुणे; श्रीविद्या प्रकाशन

घोरमोडे के यु व घोरमोडे कला, (२००८), शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे. नागपूर; विद्या प्रकाशन.

जगताप ह.ना.,(२०१२),'शैक्षणिक मानसशास्त्र' पुणे; प्रोफीशंट पब्लिक हाऊस.

बर्वे मीनाक्षी व कुंडले सुरेखा, (२००८), शैक्षणिक मूल्यमापन, संख्याशास्त्र व कृती संशोधन .पुणे; नित्य नूतन प्रकाशन.

भिंताडे वि.रा.,(२०११)'शैक्षणिक संशोधन पद्धती' पुणे; नित्यनूतन प्रकाशन.